• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३५ • गुरुवार, दि. ७ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 335 • Thursday 7 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# बीड लोकसभेसाठी प्रितम, पंकजा ?



**बीड । प्रतिनिधी**


महाराष्ट्रात राजकीय हालचालींना वेग आलाय. भाजपने बीड लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार प्रीतम मुंडे यांच्याऐवजी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या नावाला केंद्रीय नेतृत्वाने पसंती असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीत प्रीतम मुंडे यांच्याऐवजी पंकजा मुंडे मैदानात उतरताना दिसू शकतात. भारतीय जनता पक्ष लोकसभेच्या ३२ जागा लढवण्यावर ठाम आहे. त्यामुळे महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदेंच्या शिवसेनेला किती जागा मिळणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. महाराष्ट्र दौऱ्यामुळे महायुतीतील जागा वाटपांच्या हालचाली वाढल्या आहेत. भाजप आणि मित्र पक्षांच्या जागा वाटपावर बुधवारी (दि.६) शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. जागा वाटपचा तिढा सोडवणार असेही बोलले जात आहे. मराठवाड्यातील हिंगोली, जालना, नांदेड आणि उस्मानाबाद मतदारसंघासाठी भाजपकडून उमेदवार देण्यात येण्याची शक्यता आहे. हिंगोली मतदारसंघातून हेमंत पाटील यांच्या जागेसाठी भाजपा आग्रही असून त्याठिकाणी भाजपा तानाजी मुरकुटे यांना मिळण्याची शक्यता आहे. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातून नुकतेच भाजपवासी झालेले बसवराज पाटील निवडणुकीच्या मैदानात असतील असे बोलले जात आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त बालविवाह प्रतिबंध संदेश गावोगावी पोहोचवावा -जिल्हाधिकारी मुधोळ



**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त बालविवाह प्रतिबंध संदेश गावोगावी पोहोचवावा असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती तसेच सर्व शासकीय निमशासकीय विभागांमध्ये बालविवाह प्रतिबंधात्मक शपथ घ्यावी. तसेच किमान एक शासकीय कर्मचारी यांनी पाच महिलांना सामाजिक व आर्थिक पातळीवर मदत करण्याचे आवाहन यानिमित्ताने जिल्हाधिकारी यांनी केले आहे. जागतिक महिला दिनानिमित्ताने ८ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय खाजगी तसेच ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रम आयोजित करून महिला दिन साजरा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व विभागातील आस्थापना तसेच खाजगी आस्थापना मध्येही स्वयंप्रेरणेने बालविवाह प्रतिबंध शपथ घेण्यात यावी. सर्व शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनी आपल्या परिचयातील **पुढील पानावर**



बीड – मेडीकेअर हार्ट अँड क्रिटीकल केअर हॉस्पिटलला दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नारनाळे यांनी भेट दिली असता सत्कार करतांना डॉ. बोबडे साहेब, शेख सर, दिगंबर नरनाळे.

## आजी-माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आम्ही दगड मानून दिलेल्या आणि आकार नसलेलेल्या व्यक्तीला आपण देव म्हणून निवडून दिले. जो आपल्यामुळे आमदार झाला त्यानेच तुमचा विश्वासघात केला. या सर्व गोष्टीची जबाबदारी मी स्वत:घेवून तुम्हा सर्वांची माफी मागतो असे स्पष्ट करत आपल्या सर्वांना विश्वासात घेतल्याशिवाय बीडमध्ये उमेदवार लादला जाणार नाही. बीडमधील सर्व तरुण आणि नगरपालिकेतील अनुभवी पदाधिकार्यांना विश्वासात घेवून यापुढे कोणतेही निर्णय घेतले जाणार नाहीत अशी ग्वाही पालकंमत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. तर अजितदादा तुम्ही सर्वांनी गतवेळी विधानसभेचा उमेदवार आमच्यावर लादला. ते ५०० मतांचे सुध्दा मालक नव्हते. पण वीस-वीस वर्ष जे नगरपालिकेत सदस्य होते, त्यांनी केलेल्या आवाहनानुसार अनेक मते मिळाली अन् ते आमदार झाले, पण तो अपघात



होता. आम्हाला विकास आघाडी करुन न.प.निवडणूक लढवावी लागली. त्यात २२ नगरसेवक आमचे निवडून आले, पण तरीही आम्ही पक्ष सोडला नाही. इतके दिवस बीडमध्ये अल्पसंख्याकांवर अन्याय झाला. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने भूमिका मांडली, त्यामुळेच आता दादा आम्ही तुमच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादीत प्रवेश करत आहोत, कारण तुम्ही दिलेला शब्द पाळता **पुढील पानावर**

## इतिहासातील स्वारातीमधील दंडाची पहिली पावती फाडणारे स्वच्छता निरीक्षकांचा धडाका



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आंबेजोगाई च्या स्वच्छता निरीक्षकाची धडाकेबाज कामगिरी स्वारातीच्या स्वच्छता निरीक्षक प्रताप चिंतामणी यांनी दोन दिवसांपूर्वी स्वच्छता निरीक्षक या पदावर रुजू झाल्या नंतर स्वाराती मधील स्वच्छता करणे एवढेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कामाला सुरुवात केली. स्वच्छतेचे काम हाती घेतल्यानंतर सकाळी सात वाजल्यापासून प्रत्येक वार्ड मध्ये मामांची नेमणूक करणे. सर्जिकल कचऱ्याची विल्हेवाट, नातेवाईकांनी उरलेले अन्न आणि हॉस्पिटल मधील इतर निघणारा कचरा यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मी सतत तत्पर असतो. हे काम करत असताना एका व्यक्तीने माझ्यासमोर स्वाराती आवारामध्ये थुंकत असताना मला दिसले .त्या व्यक्तीवर शा. नियम क्र १३००/ ४९ दि २४ / ७ / २००० नुसार महाविद्यालय व रुग्णालय आवारामध्ये तंबाखू धूम्रपान करणे, मिस्त्री खाणे व थुंकणे या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला १०० रुपये दंड आकारला जाईल या क्टनुसार जी दंडाची रक्कम आहे मी ती त्या व्यक्तीकडून वसूल करून त्याच्या नावे पावती देण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्वच्छता निरीक्षक पदाची सूत्र हाती घेतल्यानंतर माझ्यापुढे सर्वात मोठे आव्हान होते की कमी कर्मचाऱ्यां मध्ये प्रत्येक **पुढील पानावर**

## मारहाणीच्या घटना

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेल्या हिवर सिंगा, अंबाजोगाई येथे शेडो फॅक्स कुरिअर ऑफिस, प्रशांत नगर समोर आणि परळी शहरात इमदादुल शाळा येथे मारहाणीच्या घटना घडल्या असून याप्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाणे, अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे आणि परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद झाले आहेत. शिरूर येथील सखाराम सुभाष सालपे या शेतकर्याने दिलेल्या तक्रारीनुसार रामेश्वर किसन पांडुळे याच्याविरुद्ध मारहाणीची तक्रार दिल्याने शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून सहायक फौजदार सोनवणे पुढील तपास करीत आहेत. अंबाजोगाई शहरातील अभिजीत रावण जाधव या तरुणाने दिलेल्या तक्रारीनुसार स्नेहा अनिकेत जाधव ज्योती छोटूलाल गायकवाड, पद्मीनबाई लक्ष्मण जाधव या तघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला तक्रारीनुसार होळंबे यांच्या विरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार कुंडगीर करीत आहेत.

## वाळूमाफियांवर कारवाई

गेवराई – चकलांबा पोलीस रात्री पेट्रोलिंग करत असताना वाळूची विनापरवाना बेकायदेशीर चोरटी वाहतूक करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या असून या कारवाईत तब्बल साठ लाख रुपयांचा मुद्यामाल जप्त करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी कि, चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एकशिंगे व पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, राक्षस भवन भागातून वाळूची विनापरवाना बेकायदेशीर चोरटी वाहतूक होत आहे. त्यानुसार त्यांनी सापळा रचला असता रात्री २१.३० वाजता ड्रायव्हरसह वाळूने भरलेला एक हायवा व सकाळी ७.०० वाजता ड्रायव्हरसह वाळूने भरलेला एक हायवा असे एकूण दोन हायवा (किंमत अंदाजे ६० लाख रुपये) सापळा रचून पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून आरोपींवर गुन्हा **पुढील पानावर**

## फायनान्स कंपनीत अपहार

बीड – महिला गटांनी घेतलेल्या कर्जाचे हप्ते वसूल करून ग्राहक सेवा प्रतिनिधीने ती ९० हजारांची रक्कम फायनान्स कंपनीच्या कार्यालयात जमा केली नाही. सदरील प्रकार उघडकीस आल्यानंतर त्या कर्मचाऱ्यावर कंपनीने अंबाजोगाई शहर ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवला. एका मायक्रो कंपनीच्या अंबाजोगाई शाखेचे शाखाधिकारी संतोष ओंकार डोणे यांच्या फिर्यादीनुसार, त्यांच्या कंपनीच्या वतीने महिला बचत गटांना लघु उद्योगासाठी कर्ज दिल्या जाते. लिंबगाव येथील विविध बचत गटाकडून एकूण ९० हजार २६२ रुपये कर्जाच्या हप्त्यापोटी वसूल केले. अनेकदा शोध घेऊनही तो सापडत नसल्याने अखेर शाखाधिकारी डोणे यांनी अंबाजोगाई शहर ठाण्यात तक्रार दिली.

## महिलेचा विनयभंग करून मारहाण

अंभोरा- येथील धनगरवाडी येथे एका २६ वर्षीय महिलेचा हात धरून झटापट करत विनयभंग करून व मारहाण करण्यात आली. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद झाला आहे. धनगरवाडी येथे राहणारी एका २६ वर्षीय महिलेला आजिनाथ नारायण पवार व सुवर्णा आदिनाथ पवार दोन्ही रा. धनगरवाडी, ता. आष्टी, जि. बीड यांनी फिर्यादी महिलेचा हा धरून तू माझ्यासोबत चल असे म्हणत अंगाला झटापट करून स्त्री मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले तर आरोपी सुवर्णा पवार याने तू नवर्यावर संशय का घेतेस या कारणावरून चाप्टाने मारहाण केली व दोघांनी मिळून शिवीगाळ केली. याप्रकरणी फिर्यादी महिलेने आजिनाथ पवार व सुवर्णा पवार यांच्याविरुद्ध दिलेल्या तक्रारीनुसार अंभोरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस नाईक कांबळे पुढील तपास करीत आहेत.

## तहसील कार्यालयासमोर अतिक्रमणधारकांचे उपोषण

केज – येथील सर्वे नं. ५३९ मधील जमिनीवर सन १९८९ पासून गावातील ४८ ते ५० कुटुंबांनी अतिक्रमण करून पक्की घरे बांधली आहेत. त्यांना गावात दुसरे घर नसल्याने त्यांची अतिक्रमणे न काढण्याचा ठराव ९ जुलै १९८९ च्या ग्रामसभेत मंजूर झाला असून सदर जागेचा कबाला रक्कम संबधित कार्यालयास भरण्यास हे अतिक्रमण धारक तयार असून तसा अर्ज ही २ ऑगस्ट २०१२ रोजी तहसील कार्यालयास दिलेला आहे. मात्र अद्याप कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसून हे अतिक्रमण धारक बेघर होऊ नयेत म्हणून अतिक्रमण नियमाकुल करण्यात यावे अशी मागणी अतिक्रमण धारकांनी करत या मागणीसाठी त्यांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

## महिलेचे सोन्याचे गंठण पळविले

बीड – दिनांक पाच मार्च २०२४ रोजी दुपारी एक वाचण्याच्या सुमारास बीड बस स्थानकामधून सुलभा गाडे यांचे सोन्याचे गंठण पळविल्याची घटना घडली असून याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद झाला आहे. पुणे जिल्ह्यातील वाघोली येथील काळुबाई नगर मधील रहिवासी सुलभा मनोज गाडे या ४५ वर्षीय महिला प्रवासानिमित्ताने बीड बस स्थानकात बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे जुने वापरते सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले. ज्याची अंदाजे किंमत ५० हजार रुपये होती. ही बाब लक्षात आल्यानंतर सुलभा गाडे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे धाव घेत तक्रार नोंदविली.

## संपादकीय

# पेपर फुटीमुळे परीक्षांवर प्रश्नचिन्ह!

उत्तर प्रदेशात पोलिस भरतीचा पेपर फुटल्याने ती परीक्षा रद्द करण्यात आली. आता ४८ लाख विद्यार्थ्यांनी काय करावे, असा प्रश्न पडला आहे. गेल्या पाच वर्षांत १५ राज्यांत सरकारी नोकर भरती परीक्षेचे पेपर फुटण्याचे ४१ प्रकार घडले. सरकारने अलीकडेच यासंदर्भातील कायद्याचे विधेयकही पारित केले आहे. प्रत्यक्षात समस्येचे मूळ अन्य कोठेतरी आहे आणि तपास मात्र भलतीकडेच केला जात आहे. कोणतेही यश गाठण्याला शॉर्टकट नसतो. यश मिळवण्यासाठी लांबचा पल्ला पार करावा लागतो आणि तेही प्रामाणिकपणाने आणि समर्पित भावनेने पूर्ण करावा लागतो. कोणत्याही स्थितीत लवकर उद्देश गाठण्यासाठी निवडलेल्या जवळच्या मार्गाने मिळालेले यशही अल्पकाल टिकते. अर्थात, या गोष्टी ठाऊक असूनही शॉर्टकट मारणार्या लोकांची संख्या कमी नाही. सभोवताली प्रत्येक ठिकाणी अशीच माणसे दिसतात. विशेषत: तरुण मंडळींत हा विचार तर ठाण मांडून बसला आहे. परिणाम आपल्याच बाजूने पाहिजे, असा विचार त्यांच्या मनात सतत घोळत असतो. अर्थात, या विचारांची पायाभरणी ही शालेय जीवनातूनच सुरू होते. म्हणूनच शाळा आणि महाविद्यालयांच्या परीक्षा असो किंवा प्रवेश परीक्षा किंवा नोकरी मिळवण्याची परीक्षा असो, प्रत्येक पातळीवर शॉर्टकट मारणार्यांची संख्या विपुल आहे आणि या विचारांतूनच परीक्षेच्या गैरप्रकारांना ऊत आला आहे. यापूर्वी आपल्या कानावर कधीही न पडणारा शब्द परीक्षा माफिया तो आता सतत पडत आहे. भारतात पेपर फुटीच्या बातम्या नेहमीच येत असतात. त्या आधारे परीक्षा रद्दही होतात. आताचे ताजे उदाहरण उत्तर प्रदेशचे घेता येईल. या ठिकाणी पोलिस भरतीचा पेपर फुटल्याने ती परीक्षा रद्द करण्यात आली. आता ४८ लाख विद्यार्थ्यांनी काय करावे, याचा विचार न केलेलाच बरा. अशा प्रकारच्या अनुभवाचा सामना करणार्या उत्तर प्रदेशातील लोकांनी आणखी एक गोष्ट जाणून घेतली पाहिजे आणि ती म्हणजे गेल्या ५ वर्षांत पंधरा राज्यांत नोकर भरती परीक्षेचे पेपर फुटण्याचे ४१ प्रकार घडले. मग जे पकडले गेले नाहीत, त्यांचे काय? रेल्वे भरती परीक्षेच्या निकालात गैरप्रकाराची तक्रार झाल्यानंतरही बराच गोंधळ झाला. त्यामुळे परीक्षा स्थगित करावी लागली. या परीक्षेत सुमारे ३५ हजार २०० पेक्षा अधिक पदांसाठी सुमारे ७ लाख उमेदवारांना शॉर्टलिस्ट केले होते. सन २०२२ मध्ये सीबीआयने जेईई, सीईटी प्रवेश परीक्षेत गैरप्रकार केल्याप्रकरणी एका रशियन हॅकरला पकडले होते. हा हॅकर एका कोचिंग क्लाससाठी काम करत होता. हा प्रकार फसवणुकीचा कळस मानला गेला. परीक्षेतील गैरप्रकाराविरुद्ध केंद्र आणि राज्यांत कायदे असून, अशा प्रकारचे कायदे असणारा हा भारत हा जगातील एकमेव देश मानता येईल. या कायद्यानुसार कडक शिक्षेची तरतूद आहे. गेल्या काही वर्षांत अनेक राज्यांतील परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कायदे आणण्यात आले. विशेषत: लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी. परीक्षेतील फसवणूक आणि गैरप्रकारांना रोखण्यासाठी २०23 मध्ये उत्तराखंडमध्ये कडक कायदा करण्यात आला. गुजरातमध्ये तर २०१५ नंतर एकही वर्ष असे जात नव्हते की, भरती परीक्षेचा पेपर फुटत नसेल. त्यामुळे २०23 मध्ये गुजरात विधानसभेत सार्वजनिक परीक्षेतील फसवणूक रोखण्यासाठी दंडात्मक कायदा आणला आणि तो मंजूर केला. अन्य राज्यांप्रमाणेच जसे राजस्थान (२०२२), उत्तर प्रदेश (१९९८ मध्ये मंजूर केलेला कायदा) आणि आंध्र प्रदेश (१९९७ मध्ये मंजूर केलेला कायदा) मधील कायदेही सारखेच आहेत. संसदेने सरकारी नोकरी आणि सार्वजनिक महाविद्यालयांतील प्रवेश परीक्षेत कॉपी रोखण्यासाठी एक कडक कायदा तयार केला. या कायद्यानुसार पेपर फोडणार्यांना किमान तीन वर्षांपासून दहा वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली. यात दहा लाखांपासून एक कोटी रुपयांपर्यंतचा दंडही ठेवण्यात आला. नवा कायदा हा थेटपणे विद्यार्थ्यांवर दंड आकारत नाही, तर पेपर फोडणार्यांना म्हणजे 'परीक्षा माफियां'ना टार्गेट करते. हा कायदा संघीय सरकारचा आणि परीक्षा आयोजित करणार्या परीक्षा संस्थांना लागू होईल. हे सर्व गुन्हे अजामीनपात्र आहेत आणि त्यांची चौकशी वरिष्ठ पोलिस अधिकार्यांमार्फत केली जाईल, अशी त्यात तरतूद आहे. केवळ कायदाच नाही, तर २०१७ मध्ये केंद्र सरकारने नॅशनल टेस्टिंग एजन्सी स्थापन केली आणि या संस्थेवर जेईई मेन, नीट यूजी, यूजीसी नेट, सीमॅट यासारख्या राष्ट्रीय पातळीवरच्या परीक्षांचे आयोजन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. ही राष्ट्रीय संस्था आहे आणि प्रत्येक राज्यात स्वत:चे परीक्षा मंडळ, भरती मंडळ आहे; परंतु परिणाम काय? जेव्हा पेपर फुटतो किंवा दुसर्याच्या नावावर पेपर देणारे पकडले जातात, उत्तरपत्रिकेत कॉपी पकडली जाते तेव्हा परीक्षा माफियाच्या नावावर काही धरपकड केली जाते आणि त्यात अनेक बाबूंना पकडले जाते; मात्र परीक्षा मंडळाच्या दोषी अधिकार्यांवर काही कारवाई होत नाही. परीक्षा माफियांच्या कोट्यवधीच्या गैरप्रकारात त्यांचे हात ओले नसतात, असे आपण कसे समजतो? परीक्षा आयोजन करणारे अधिकारी विद्यार्थ्यांना सुरक्षेचे अग्निदिव्य पार करायला सांगतात . नेमलेले चक्रव्यूह पार करणे म्हणजे बायोमेट्रिक व्यवस्था, फेशियल रिकग्निशन, मोबाईल जॅमर, सीसीटीव्ही, स्कॅनिंग एक्स-रे आणि काय-काय खबरदारी घ्यायला लावतात आणि अशा प्रकारचे नियोजन करताना थकतही नाहीत; पण एखादा पेपर फुटल्यास किंवा कॉपी झाल्यानंतर त्यांना आरोपीच्या पिंजर्यात उभे केले जात नाही. प्रत्यक्षात समस्येचे मूळ अन्य कोठेतरी आहे आणि तपास मात्र भलतीकडेच केला जात आहे. वाढती बेरोजगारी, सरकारी नोकरीचा हट्ट, सामाजिक सुरक्षेत असणारा अभाव, गरिबी, भ्रष्टाचाराला चालना, फसवणूक यासारख्या गोष्टी पेपर फुटीला कारणीभूत असून तेथेच त्यांची पाळेमुळे रुजलेली आहेत आणि ती अधिकाधिक घट्ट होत आहेत.

पान १ वरून

### आजी-माजी नगरसेवक

याचा विश्वास पूर्ण बीड जिल्ह्याला आहे अशा भावना न.प.चे माजी गटनेते फारुक पटेल यांनी मांडल्या. यावेळी बीड न.प.चे माजी बांधकाम सभापती अमर नाईकवाडे यांनी अन्यायाला वाचा फोडली, ज्यावेळी अजितदादा आणि धनूभाऊंचा महायुती सरकारमध्ये शपथविधी झाला त्यावेळी खर्या अर्थाने इकडे बीडमध्ये आम्ही पण स्वतंत्र झालो. आम्हाला हक्काचे घर मिळाले, आम्ही इतके दिवस पक्षाचे काम केले, पण आमदार निवडून आल्यानंतर पक्ष विचारायला सुध्दा तयार नव्हता आम्हाला. पालकमंत्री धनंजय मुंडेंनासुध्दा भेटता येत नव्हतं, नगरच्या रेस्टहाऊसला जावून भेटावे लागले, मात्र धनंजय मुंडे यांनी आम्हा सर्वांना योग्य दिशा दिली म्हणून हे टिकून राहिले नाहीतर आज हे सर्वजण राजकीयदृष्ट्या दिशाहिन झाले असते. आमचा सतत फुटबॉल झाला.मात्र आम्ही पक्षासाठी प्रामाणिक काम करत आलोय. यापुढेही आम्ही एकनिष्ठेने काम करत राहू. अशी ग्वाही अमर नाईकवाडे यांनी दिली. मंगळवारी (दि.५) बीड नगरपालिकेचे मा. गटनेते फारुक पटेल यांच्यासह बांधकाम सभापती आणि गटनेते म्हणून काम पाहिलेले अमर नाईकवाडे यांच्यासह मा. उपनगराध्यक्ष मोईन मास्टर, मा. नगरसेवक जलील पठाण, प्रभाकर पोपळे, मा. उपनगराध्यक्ष शेख शाकेर, माजी उपनगराध्यक्ष नसीम इनामदार, भैय्यासाहेब मोरे, माजी सभापती अशफाक इनामदार, गणेश तांदळे, शेख सादेक, माजी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक आघाडी बरकत पठाण, माजी नगरसेवक अक्रम बागवान, ऑल इंडिया मोमीन कॉन्फरन्सचे जिल्हाध्यक्ष शेख सादेक (अंबानी), माजी नगरसेवक शकिल (बिल्डर)खान, माजी नगरसेवक इलियास टेलर, अलिम कुरेशी, शेख युनुस, रफीक बागवान, अय्युब खान, शेख अजिम, सय्यद नदीम, बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल, रामदास सरवदे, सय्यद रहीम, संतोष क्षीरसागर, शेख इलियास, संभाजी काळे, भैय्या पवळे, बाळु धोत्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी मुंबईत पक्षाध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तत्पूर्वी बीड शहरातून तब्बल ३०० वाहनांचा ताफा घेवून हे पदाधिकारी मुंबईत रवाना झाले. सर्व पदाधिकार्यांचा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा पक्ष प्रवेश सोहळा घडवून आणण्यासाठी माजी आ.अमरसिंह पंडीत यांनी सातत्याने पाठपुरावा केला. पक्षप्रवेशप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषी मंत्री धनंजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंहजी पंडित, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बजरंग बप्पा सोनवणे, नारायण बाप्पा शिंदे, जिल्हा सरचिटणीस अविनाश नाईकवाडे, तालुकाध्यक्ष महादेव उबाळे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, आज पक्षात प्रवेश घेतलेले सर्व पदाधिकारी मागील ३० वर्षांपासून माझ्या जीवाभावाचे सदस्य आहेत.या सर्वांनी २०१९ ते आजपर्यंत अनेक अडचणींचा सामना केला,मात्र आता या अडचणी थांबल्या आहेत. मी आपल्या सर्व अडचणी जाणतो असे सांगत धनंजय मुंडे म्हणाले, अजितदादा, तुम्ही मला यापूर्वी पालकमंत्री केले, पण बीडला जायलाच मला परवानगी नव्हती. उलट ती परवानगी मी तोडली तर माझ्या तक्रारी होण्याची भीती होती. पण मी या लोकांचा विश्वास तुटू दिला नाही. वास्तविक या सर्व पदाधिकार्यांशी माझा तीस वर्षांपासूनचा स्नेह आहे. दादाही आपलेच नेते आहेत. माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना घडवणारे नेते अजितदादा आहेत. यापुढे बीड विधानसभेचे जे-जे प्रश्न आहेत, ते आता सोडवण्यासाठी अजितदादांनी पुढाकार घ्यावा. बीड विधानसभेचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिकचा निधी अर्थमंत्री म्हणून अजितदादांनी द्यावा अशी मागणी त्यांनी केली. बीड शहरात विकासाची जी एक-एक विट रचली गेली, ती अजितदादांच्या सहकार्यामुळे रचली गेली असेही धनंजय मुंडे म्हणाले. लवकरच बीडमध्ये अजित पवारांची सभा होईल असेही ते म्हणाले. यावेळी न.प.चे माजी सभापती अमर नाईकवाडे म्हणाले, २०१६ ला अजितदादा दुष्काळ परिषदेला बीडला आले अन् बीडचे भाग्य बदलले. आज मला मर्म मांडायचे आहे, आम्ही सर्वसामान्य घरातून आलेलो सर्वजण आहोत. इथ यायचं कारण २०१६ ते २०२४ या कालावधीत आम्ही राजकीयदृष्ट्या होरपळून निघालो. यांनी इकडून मारायचं,त्यांनी तिकडून मारायचं, तरी आम्ही संयम सोडला नाही, आणि स्वत:ला विकलंही नाही.या आठ वर्षामध्ये आम्हाला पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आम्हाला आधार दिला, पण त्यांच्याजवळ आमचं म्हणण मांडायलासुध्दा आम्हाला ७ वर्ष लागले. आम्ही समोरच्यासोबत न्यायालयीन लढाई लढलो. धनभाऊंनी शब्द दिला होता की,घड्याळाचा उमेदवार निवडून आणायचा,सर्व तरुणांनी जिवाचं रानं केले. बीडचे हे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते अजितदादांवर खूप प्रेम करणारे आहेत, आजपर्यंत हे सगळे एकतर्फी प्रेम झाले. तुम्हाला यांनी माहितीच होवू दिले नाही की, आम्ही पण पक्षासाठी एकनिष्ठेने काम करतोय. असे सांगत अमर नाईकवाडे म्हणाले, आपल्या पक्षाच्या चष्म्यातून ठराविकच लोक दिसू नयेत. आज स्वखर्चाने ३०० गाड्या घेवून हे पोरं इथे प्रवेशासाठी आले आहेत. आमच्या बीडमध्ये २०१९ मध्ये जो आमदार निवडून आला तेव्हांपासून आजपर्यंत जी आमची २५ माणसांची कोअर टीम होती, ती आज त्यांच्यासोबत राहिलेली नाही. आणि अशा परिस्थितीत आम्ही कुणाच्या दावणीला बांधले गेलो नाहीत तर धनभाऊंना विचारल्याशिवाय एकही गोष्ट केली नाही.मधल्या काळात जो निर्णय आम्ही घेतला तो ही धनंजय मुंडे यांना विचारुन घेतला होता असेही नाईकवाडे यांनी स्पष्ट केले.यावेळी न.प.चे माजी गटनेते फारुक पटेल म्हणाले, आज आम्ही राष्ट्रवादीत प्रवेश करत असलो तरी आजपर्यंत आम्ही कधीही कोणत्याही निवडणूकीत राष्ट्रवादीच्या विरोधात काम केले नाही. एक अपघात झाला, मात्र बीड नगरपरिषदेत आम्हा अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अन्यायाला वैतागून आम्ही दहा लोकांनी ही नगरपालिका निवडणूक आम्ही तत्कालीन विद्यमान नगराध्यक्षांच्या विरोधात लढवायची अशी शपथ घेतली होती. यावेळी जेष्ठ नेते मोईन मास्टर म्हणाले, अजितदादा हा तो खाफिला आहे, की ज्यांना ३० वर्ष वनवास भोगावा लागला आहे. आमच्यावर माणसं लादले गेले त्यामुळे वनवास भोगावा लागला होता. मात्र कधी आपल्यासोबत भेट होईल याची प्रतीक्षा आम्हा सर्वांना होती. अमर नाईकवाडे अन् अमसिंह पंडीत भेटले अन् त्यांच्यात एकत्र यायचे ठरल्यानंतर ही बाब परळीत धनंजय मुंडेंसमोर मांडली, त्यानंतर आता आज हा पक्षप्रवेश होत आहे याचा मला आनंद आहे. बीड जिल्ह्यात आगामी काळात एकजुटीने राष्ट्रवादीचे काम पुढे नेले जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रारंभी नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक शेख सादेक, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याण काका आखाडे, युवा नेते बळीराम गवते, नगरसेवक गणेश तांदळे, माजी सभापती अश्फाक इनामदार यांची भाषणे झाली.कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन सुरेश साळुंके यांनी केले.

यावेळी अमर नाईकवाडेंनी पदाधिकार्यांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडली, तसेच ते म्हणाले, दगड द्या, आम्ही शेंदूर लावू असे आम्ही यापूर्वीच्या निवडणूकीत म्हणालो होतो. आताही दगड द्या, पण त्याला आकार असलेला द्या, म्हणजे त्यावर शेंदूर लावल्यावर किमान तो देव आहे, असं तरी लोकांना सांगता येईल. यापूर्वी आम्ही बीडमधील जनतेला विकासकामांचे शब्द दिले पण ते पूर्ण न झाल्याने आमची अडचण झाली असेही नाईकवाडेंनी सांगितले. अमर नाईकवाडे यांनी यावेळी बीडमधील पाणी प्रश्नासंदर्भात अजितदादांना माहिती दिली. अमृत अटल योजनेचे काम संपत आलेले आहे. २०१७-१८ मध्ये ही योजना मंजूर झाली होती. २० एमएलडी पाणी त्यातून मिळते. मात्र आता लोड एक्सटेंशन होणे गरजेचे आहे. तो मिळाला तर दुष्काळी बीड शहरात पाणी वाढून मिळेल. बीड नगरपालिकेला पाणी पुरवठ्याचे १५ कोटींचे बील महावितरणला देणे आहे. शिवाय यावर १८ कोटींचे व्याज लागलेले आहे. अशास्थितीत ज्याप्रमाणे इतर क वर्ग गटातील नगरपालिकेंचे व्याज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, तसा निर्णय बीड न.प.च्या बाबतीत व्हावा व बीड नगर परिषदेने बीड शहरातील एकूण १७ रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रीट बांधणी करिता तयार केलेल्या नगरोत्थान योजनेच्या प्रस्तावाला मान्यता द्या अशी मागणीही अमर नाईकवाडे यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे केली.

### इतिहासातील स्वारातीमधील

वार्डची योग्य पद्धतीने स्वच्छता होणे. अनेक प्रकारच्या कचरा निघत आहे रुग्णांचे नातेवाईक दारूच्या बाटल्या, पाण्याच्या बाटल्या पाण्याचे नारळ, तंबाखू ,चैनी ,गुटखा, पान मसाला हे खाऊन दवाखान्यातील परिसरामध्ये कुठेही इतरेत फेकून देणे त्यामुळे दुर्गंधी सुटणे व त्याचे रुग्णांना इन्फेक्शन होणे हे सगळ्यात मोठे कारण आहे.दवाखाना,शाळा , बस स्टॅन्ड , शासकीय कार्यालय या ठिकाणी नागरिकांनी नियमाचे उल्लंघन न करता व मर्यादीत वागावे असे आव्हान करतो. मी या अगोदर अनेक शासकीय महाविद्यालयांमध्ये सेवा बजावत असताना अनेक व्यक्तीकडून दंड वसूल केलेला आहे पण स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये असे यापूर्वी कधीही झाले नसल्यामुळे रुग्णांची तपासणीसाठी येणारे व नातेवाईकांना यापुढे अशी कोणतीही सुट दिली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय चा स्वच्छता निरक्षक म्हणून माझी कामगिरी मी चांगल्या प्रकारे निभावत आहे याचा मला आनंद आहे. या दंडाच्या माध्यमातून यापुढे सर्वांनी शासकीय आवारामध्ये कुठेही धूम्रपान करणे तंबाखू पान खाऊन थूंकणे असे कराल तर मी दंड वसूल करण्यास सक्षम आहे असे यावेळी बोलताना व्यक्त केले. प्रताप चिंतामणी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आंबेजोगाई

### वाळूमाफियांवर कारवाई

दाखल असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुमावत करत आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपवगीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नारायण एक शिंगे, प्र पोलीस उपनिरीक्षक कुमावत, श्री.गुजर, श्री.घोंगडे, पवळ, रुईकर, सुरवसे यांनी केली.

# केज तालुक्यात इयत्ता दहावी बारावीच्या परीक्षा सुरळीत -बेडसकर

**केज । प्रतिनिधी**

केज शहरासह तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रावर इयत्ता दहावी,बारावीच्या परीक्षा सुरळीत चालू आहेत असे प्रसिद्धी पत्रकात गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर व जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिलराव केंद्रे यांनी म्हटले आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की,सन २०२३-२४ वर्षातील इयत्ता दहावी व इयत्ता बारावीच्या परीक्षामहाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ अंतर्गत विभागीय परीक्षा मंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी पासून इयत्ता बारावी व दिनांक १ मार्च २०२४ रोजी पासून नियमाप्रमाणे परीक्षा शहरासह तालुक्यात सुरळीत चालू आहेत.या परीक्षेचेपरीक्षक कार्यालयाचे प्रमुख गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे असून सदर कार्यालय गट साधन केंद्र केज येथे आहे.सदर परीक्षे चे नियोजन भयमुक्त, कॉपीमुक्त पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कस्टडी नायब तहसीलदार केज, मंडळ अधिकारी,तलाठी, विस्तार अधिकारीपंचायत समिती,शिक्षण,आरोग्य, पर्यवेक्षिका,एकात्मिक बालविकास प्रकल्प,केंद्र प्रमुख,सर्व केंद्राचे केंद्र संचालक,सहसंचालक यांची बैठक घेऊन सदर परीक्षेची गोपनीयता भौतिक सुविधा निर्भयपणे देता यावी,कॉफी मुक्त जिल्हा दक्षता समितीने, बोर्डाने व तालुका दक्ष समितीने दिलेल्या सूचने प्रमाणे परीक्षा पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.केज तालुक्यात एकूण इयत्ता बारावीचे दहा परीक्षा केंद्र असून या परीक्षा केंद्रावर ३८७८परीक्षार्थी परीक्षा देत आहेत.तर इयत्ता दहावी परीक्षेचे एकूण १४ केंद्र असून या परीक्षा केंद्रा वर ३६८३ परीक्षार्थी परीक्षा देत आहेत सदर परीक्षेच्या नियंत्रणासाठी इयत्ता बारावी साठी दहा बैठक पथके,इयत्ता दहावी साठी सतरा बैठे पथके तयार करण्यात आले असून प्रत्येक पथकात तीन-तीन सदस्य आहेत. सदर पथकांना रोज बदलून नवीन केंद्र दिले आहे.कॉपी मुक्तीसाठी तहसीलदार साहेब, तहसील कार्यालय केज यांचे एक भरारी पथक, गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांचे एक पथक तर गट शिक्षणाधिकारीकार्यालयाचे तीन भरारी पथके तयार करण्यात आली असून नियमितपणे सकाळदुपार परीक्षा केंद्रास भेटी दिल्या जातात.तसेच परीक्षक कार्यालयाने प्रत्येक केंद्रा वर एक सहाय्यक परीक्षकांची नेमणूक केली असून ते परीक्षा केंद्रावर पेपर पूर्ण होईपर्यंत बसून असतात.तसेच वेळेतपेपर सुरू करणे व बंद करणे याची दक्षता घेतात. बोर्डाच्या नियोजनाप्रमाणे केज तालुक्यात सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत सुरू आहे या कामी पोलीस प्रशासनाचे मोलाचे सहकार्य आहे. प्रत्येक केंद्रावर पोलीस अधिकारी,कर्मचारी,होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याचबरोबर पोलीस अधिकारी यांचे भरारी पथके आहेत.कॉपी मुक्ती साठी तालुक्यात सर्व झेरॉक्स सेंटर यांना परीक्षा कालावधीत झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पान ४ वरून

### जिल्हाधिकारी कार्यालयात

पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गत अति जोखीम मुलींच्या विषेश उपक्रमांचा शुभारंभ, बालविवाह निर्मूलन बाबत विशेष लघुपटाचे लोकार्पण, बालविवाह निर्मूलन विषयावरील सहभागी नाट्य प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थ्यांचा सन्मान, विशेष कार्य करणाऱ्या शासकीय सेवेतील विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांचा सत्कार, महिला बालकल्याण विभाग,एकात्मिक बालविकास सेवा, पोलीस विभाग,आरोग्य,शिक्षण विभागतील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांच्या विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या वेळी नाट्यप्रशिक्षणातील माहितीपट दाखवला जाणार आहे.

### पशुधनाच्या काळजीसाठी

आले. यावेळी आ.बाळासाहेब आजबे, आ. संग्राम जगताप, कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी आयुक्त प्रवीण गेडाम, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू कर्नल डॉ. पी.जी. पाटील तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते. यावेळी कृषी मंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, वातावरणीय बदलामुळे पावसाने दिलेली ओढ, अतिवृष्टी, ढगफुटी, वाढते तापमान, उष्माघात व पावसाचा अकल्पित लहरीपणा अशा गोष्टी वारंवार घडत आहेत. त्यामुळे पशुधनास चारा व पाणी पुरविण्यावर तर परिणाम होतच आहे, पण पशुधनाच्या आरोग्यावर देखील गंभीर परिणाम होत आहे. संकरित गाई व म्हशींमध्ये दुग्ध उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. दुभत्या गाईचे दुध उत्पादन ५ ते २० टक्क्यांपर्यंत घटल्याचे आढळून आले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी हे प महत्वाची भूमिका पार पाडेल. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना जनावरांचा उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे, योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे, फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलित पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. आपण नोंदणी करून आपला मोबाईल नंबर टाकावा. ओटीपी मिळाल्यानंतर आपला पत्ता व लोकेशन टाकून ॲप चालू करावे. आपणास हव्या असलेल्या गाईंच्या गोठ्याचे किंवा स्थळाचे लोकेशन घेऊन त्या ठिकाणीचे तपमान आद्रता निर्देशांक मिळतो. त्याद्वारे गाईंचा ताण ओळखून सल्ला मिळू शकतो. हे ॲप ओपन सोर्स हवामान माहितीच्या बरोबरीनेच तापमान व आर्द्रतेचे सेन्सर्स वापरून मिळणाऱ्या प्रत्यक्ष माहितीच्या माध्यमातून तापमान आर्द्रता निर्देशांकाच्या आधारे शेतकऱ्यांना व्यक्तिगत सल्ला व सूचना पुरवते. म. फुले कृषी विद्यापीठ मार्फत विकसित करण्यात आलेल्या या ॲपचा व्यावसायिक विस्तार करण्याचे काम परळी येथील श्रीकृष्ण मुळे या तरुणाकडे देण्यात आले आहे. त्याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी त्याची तसेच त्याच्या वडिलांची पाठ थोपाटली.

### अनाधिकृत बांधकाम

सादर करावा अन्यथा आपल्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असे आदेश काढले आहेत.परंतु एकंदरीतच यापुर्वीचा इतिहास पाहता मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे खरच कारवाई करतील की हा केवळ कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार आहे अशी शंका डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केली आहे. डॉ.गणेश ढवळे यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने आपणास वारंवार बीड शहरातील बिंदुसरा ,करपरा नदी,नाले,ओढे व बिंदुसरा नदीपात्रातील भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम बाबत ठोस कार्यवाही करणेसाठी प्रकरणात सर्व्हेक्षण करण्यात येऊन पुरग्रस्त रेषेतील अनाधिकृत बांधकाम प्रकरणात तातडीने कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.परंतु अद्यापही प्रकरणात कारवाई करून अहवाल सादर केलेला नाही.सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही बाबत अर्जदार यांना परस्पर कळवावे व अहवाल सादर करावा असे कळविले होते.परंतु आपण संबंधितांना कळविले नाही.यावरून असे लक्षात येते की आपण त्या प्रकरणी काहीच कार्यवाही केलेली नाही . त्याअनुषंगाने स्वच्छता विभाग यांनी तातडीने नियमानुसार संयुक्त कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा अन्यथा आपल्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी असे लेखी आदेश मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांनी नगर रचना विभाग प्रमुख न.प.बीड, स्वच्छता विभाग प्रमुख न.प.बीड, स्वच्छता निरीक्षक न.प.बीड रुपकांत जोगदंड , सुनिल काळकुटे,शेख अयुब शेख हशम,भारत चांदणे, शशिकांत जोगदंड आणि अतिक्रमण पथक प्रमुख न.प.बीड मुन्ना गायकवाड यांना काढले आहेत.

### प्रितमताईं मुंडे यांना

प्रसिद्ध असून त्यांना पुन्हा पंतप्रधान व प्रितमताईं मुंडे यांना खासदार पदावर विराजमान करण्यासाठी सरकारचे कामे सर्व सामान्यांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे.भारत देश मोदीजींच्या नेतृत्वाखालील प्रगतशील देश म्हणून १२ व्या क्रमांकावरून ५ क्रमांकावर आला आहे.३ क्रमांकावर आणण्याचा मोदींचा मानस आहे. खा. प्रितमताईंच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाले आहेत. आष्टी विधानसभा मतदार संघात शिक्षणाची मोठ्या प्रमाणावर सोय उपलब्ध करून दिली आहे. शिक्षण हे प्रगतीचे साधन आहे . उन्नती साधण्यासाठी प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. मा. मंत्री पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना आष्टी विधानसभा मतदारसंघात विकास कामे मोठ्या प्रमाणावर झाले आहेत.परंतु गेल्या तीन वर्षांपासून विकासाला खीळ बसली म्हणून मी २०२४ विधानसभा निवडणुक लढवावी अशी जनतेची मागणी आहे असे प्रतिपादन माजी आ.भीमराव धोंडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना केले.यावेळी व्यासपीठावर भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस युवा नेते अजयदादा धोंडे, सरपंच छाया गायकवाड, सरपंच तुकाराम गिते सरपंच दादासाहेब जगताप, सुनील सानप, गणेश सांगळे, पोपट सांगळे , अस्लम पठाण, सोनाजी आजबे, संतोष घुले आदी उपस्थित होते. पुढे बोलताना माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की, कार्यकर्ते,गटप्रमुख, गणप्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख,बुथप्रमुख यांनी मोदी सरकारने १० वर्षात विविध कल्याणकारी योजना राबवल्या त्या घराघरात पोहचवा खा. प्रितमताई मुंडे यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे. बीड मध्ये भाजपाचा खासदार करण्यासाठी आतापर्यंतचे कामे सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे. खासदार फंड फार कमी मिळतो तो प्रत्येक गावाला मिळणे शक्य नाही. खासदारांनी मोठ्या योजना राबवायच्या असतात, सरकारने पिक विमा १ रुपयात मोफत दिला जात आहे. अहमदनगर -बीड-परळी रेल्वे पाटोदा तालुक्यापर्यंत धावत आहे.लवकरच परळी पर्यंत धावेल,विकास कामात भारतीय जनता पार्टीने वेग घेतला आहे. अयोद्याचे भव्य दिव्य मंदीर साकारले गेले आहे.नरेंद्र मोदींवर विश्वास ठेवून भाजपाच्या उमेदवाराला निवडून द्यायचे आहे. त्यांच्याबरोबर ठाम राहिले पाहिजे. मोदी जगात प्रसिद्ध नेते आहेत. त्यांना पुन्हा पंतप्रधान करायच आहे. आज ५ व्या. क्रमांकावर आहोत.जगात ३ नं. प्रगतशील देश करायचा आहे. महिलांना एसटी अर्धे तिकीट झाले आहे. पीएम किसान योजनेतून शेतकऱ्यांना मिळणारा लाभ ६ हजारावरून १२ करण्यात आला आहे. भ्रष्टाचार मुक्त देश होत आहे.युद्धात आपले अडकलेले विद्यार्थी येईपर्यंत मोदी साहेबांनी युद्ध थांबवले. यावेळी बोलताना भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजय धोंडे म्हणाले की, कार्यकर्ता म्हणून मोदी सरकारने केलेली. १४ ते १९ कार्यकाळात भीमराव धोंडे यांनी केलेली कामे मोदी सरकारने व पंकजाताई,प्रितमताईंनी केलेली कामे पोहचवावेत . २०१९ मध्ये झालेल्या घटनेचा अनुभव आला आहे आता न थांबता २०२४ ची तयारी करायची आहे. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ,भीमराव धोंडे साहेब यांनी शिक्षण, विहिरी, रस्ते, विज,या सारख्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याचे काम केले आहे .मोदी सरकारने संरक्षण क्षेत्रात भक्कम योगदान दिले मोदीजींचे नेतृत्व जगाने मान्य केले.खंबीर नेतृत्व आहे.महिलांना एसटी अर्धे तिकीट झाले आहे. पीएम किसान शेतकऱ्यांना मिळणारा लाभ ६ हजारावरून १२ करण्यात आला आहे. भ्रष्टाचार मुक्त देश होत आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शालेय विद्यार्थी,वंचित घटकांपर्यंत माहिती पोहचावी असे आवाहन युवानेते अजय धोंडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच दादासाहेब जगताप यांनी केले, तर अशोक साळवे, सुनील सानप, नवनाथ सांगळे, बबन सांगळे, आदींनी मनोगत व्यक्त केले.

### वडवणी तालुक्यातील

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत काम सुरू केले. जमेल तसं पक्ष कार्यासाठी वेळ देण्यापासून ते तालुकाप्रमुख अशी त्यांची कारकीर्द जनतेतून घडली. पक्ष विस्ताराचे कार्य हाती घेत परोपरी शिवसेनेच्या विचारांचा कार्यकर्ता त्यांनी घडवला, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशा प्रमाणे त्यांनी वडवणी तालुक्यात विविध बिनविरोध निवडणुका लढवल्या बाजार समितीच्या निवडणुकीत ते केवळ दोन मताने पराभूत झाले. २०१७ च्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत त्यांनी स्वतः दोन जिल्हा परिषद आणि चार पंचायत समिती गणा मध्ये शिवसेनेचे उमेदवार उभे केले. आणि ते स्वतः त्यांचा मतदार संघ नसताना देखील जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवली. व त्यांचा अवघ्या ६ मताने पराभव झाला होता. तरीही जनसेवेचे वृत्त से अखंड जोपासत आहेत, जनतेचे मता रूपी मिळालेले प्रेम त्यांना कायम उर्जा देत आहे. विनायक बाप्पा मुळे यांच्या पुढाकाराने शिवसेनेने तालुक्यात प्रस्थापितांविरोधात अनेक निवडणुका लढविल्या. गेल्या पंचवार्षिक मध्ये वडवणी नगरपंचायत मध्ये १५ पैकी १५ जागा लढवल्या त्यामध्ये एक नगरसेवक विजय झाला. तर काही उमेदवार कमी मताने पराभूत झाले. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आजपर्यंत राजा मोर्चा असेल, बैलगाडी मोर्चा आसतील अशी कितीतरी मोर्चे काढले आहेत. यापुढेही पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने नगरपंचायत, ग्रामपंचायत, मोठ्या ताकतीने लवण्याचा निर्धार त्यांनी व त्यांच्या टीमने केलेला आहे. २४ तास कधीही कोणतीही अडचण असेल तरी हा लढवय्या नेता हजर असतो. गोर गरीबांना आज पर्यंत लाखो रुपयाची मदत केली आहे. म्हणूनच विनायक बाप्पा मुळे यांना वडवणी तालुक्यातील सर्व लहान घोर लोकनायक असे म्हणतात.

## महाराष्ट्रात भरती सुरु

मुंबई – बँकेत नोकरीची संधी शोधत असलेल्या तरुणांसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून बंपर भरती सुरू आहेत. यात एकूण ३००० प्रशिक्षणार्थी पदांची भरती केली जाणार आहे. या पदांसाठी अर्ज प्रक्रिया ६ मार्च २०२४ रोजी बंद होणार आहे. सेंट्रल बँकेने जाहीर केलेल्या रिक्त पदांसाठी अर्ज प्रक्रिया २१ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू झाली. या पदांसाठी तुम्ही ऑनलाइन अर्ज करू शकता. या पदांसाठी कशा प्रकारे अर्ज करायचा, अर्जाचे शुल्क तसेच त्यासबंधी सर्व माहिती आम्ही तुम्हाला देणार आहोत त्यामुळे तुमची अर्ज भरण्याची प्रक्रिया सोपी होईल.

## थोरातांची कन्या निवडणुकीच्या रिंगणात?

नगर – काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या मुलीची सक्रिय राजकारणात एन्ट्री झाली आहे.



यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. जयश्री थोरात यांच्यावरील नवी जबाबदारी दिल्याने चर्चांना उधाण झालं आहे. जयश्री थोरात यांची संगमनेर विधानसभा युवक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे नगरच्या राजकारणात ट्विस्ट येणार का अशीही चर्चा रंगली आहे. बाळासाहेब थोरात यांच्या कन्येची सक्रिय राजकारणात एन्ट्री झाली आहे. जयश्री थोरात यांची संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. जयश्री थोरात या सामाजिक कार्यात सहभागी असणाऱ्या जयश्री थोरात यांनी आता थेट सक्रिय राजकारणात प्रवेश केला आहे. जयश्री थोरात यांच्यावर पहिल्यांदाच पक्ष संघटनेची जबाबदारी देण्यात आली आहे.

## महिलांना मोफत बससेवा



पुणे – पीएमपीच्या महिला विशेष बसमधून महिलांना आता मोफत प्रवास करता येणार आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून जागतिक महिला दिनानिमित्त खास महिलांसाठी ही मोफत सेवा देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे दि. ८ मार्च रोजी शहरातील १७ मार्गावर दिवसभर ही मोफत सेवा दिली जाणार असून, महिलांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन पीएमपी प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या मार्गावर महिला विशेष बसमधून मोफत सेवा देण्यात येणार आहे. स्वारगेट ते हडपसर (३०१), स्वारगेट ते धायरेश्वर मंदिर (११७), शनिवारवाडा ते केशवनगर मुंढवा (१६९), कोथरूड डेपो ते पुणे स्टेशन (९४), एनडीए गेट क्र.१० ते मनपा (८२), कात्रज ते महाराष्ट्र हौसिंग बोर्ड (२४), कात्रज ते कोथरूड डेपो (१०३), हडपसर ते वारजे माळवाडी (६४), भेकराईनगर ते मनपा (१११), हडपसर ते वाघोली (१६७), अप्पर डेपो ते शिवाजीनगर (१३), मार्केटयार्ड ते पिंपळेगुरव (११), पुणे स्टेशन ते कोंढवा खुर्द (१७०), आकुर्डी रेल्वे स्टेशन ते मनपा (३२२), निगडी ते मेगा पॉलीस हिंजवडी (३७२), भोसरी ते निगडी (३६७) चिखली ते डांगे चौक (३५५) या मार्गाचा समावेश आहे.

## टेम्पोच्या धडकेत मजूर जागीच ठार

जिंतूर – परभणी रस्त्यावरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय परिसरात आज (दि. ६ मार्च) दुपारी ३ च्या दरम्यान भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर वाहनाने दुचाकीला धडक दिली. यामध्ये एकजण जागीच ठार झाला आहे. तर एक गंभीर जखमी अवस्थेत त्याला प्राथमिक उपचार जिंतूर ग्रामीण रुग्णालयात करून पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले असून दरम्यान घटना घडताताच घटनास्थळी व रुग्णालयात नातेवाईक व नागरिकांनी एकच गर्दी केली होती. दरम्यान ठार झालेला व्यक्ती साहित्य वाटपाच्या कार्यक्रमास आला होता. दरम्यान अधिक माहिती अशी की, शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात नोंदणीकृत मजुरांना संसारोपयोगी साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी अण्णा रावजी खिल्लारे (वय ५० वर्षे) व अशोक नारायण चव्हाण (वय ३५ वर्ष रा.माणकेश्वर, ता. जिंतूर) हे दोघेजण साहित्य घेण्यासाठी मानकेश्वरहून दूचाकीने परभणी रोडकडे जात असताना पाठीमागून आयशर वाहनाने भरधाव वेगात दुचाकीस उडवले. यावेळी दुचाकीवरील दोघे जण रक्तबंबाळ अवस्थेत पडले होते. घटना घडताच आयशर चालकाने वाहन घेऊन पळ काढला यावेळी नागरिकांनी त्यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून अण्णा रावजी खिल्लारे यास मृत घोषित केले. तर अशोक नारायण चव्हाण यांच्या हाताला व डोक्याला गंभीर मार असल्यामुळे प्रकृती चिंताजनक झाली होती. म्हणून त्यांना प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

# लातूरच्या पथदर्शी कामाचा इतर जिल्ह्यांनी आदर्श घ्यावा - विभागीय आयुक्त अर्दड

लातूर । वृत्तसेवा



लातूर जिल्हयाने टीमवर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. मराठवाडयातील इतर जिल्हयांनीही लातूरच्या पथदर्शी कामाचा आदर्श घ्यावा, लातूरप्रमाणेच आपल्या जिल्हयातही पथदर्शी काम उभे करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त श्री. मधुकर राजे अर्दड यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयात ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने २०२०-२१ व २०२२-२३ या वर्षातील विभागस्तरीय पुरस्काराचे वितरण विभागीय आयुक्त श्री. अर्दड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अनमोल सागर, उपायुक्त सुरेश बेदमुथा, डॉ. सीमा जगताप आदी उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्त श्री. अर्दड म्हणाले, लातूर जिल्हा शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत नेहमीच अग्रेसर राहीला आहे. गुड गर्व्हनेसमध्येही जिल्ह्याने पथदर्शी काम केले आहे. लातूरचा एक पॅटर्न आहे. शिक्षण क्षेत्रासोबतच लातूर जिल्हयाने टीमवर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. मराठवाडयातील इतर जिल्हयांनीही लातूरच्या पथदर्शी कामाचा आदर्श घेत आपल्या जिल्हयातही पथदर्शी काम उभे करावे, असे आवाहन त्यांनी केले. पंचायतराज व्यवस्थेत पुरस्कार प्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांचा गौरव करून श्री. अर्दड म्हणाले, मराठवाडयात पंचायतराज व्यवस्थेत चांगल्या पध्दतीने काम सुरू आहे. पर्यावरण क्षेत्रात कामाची गरज असून यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाातचा आहे. पर्यावरणाचा समतोल जपला गेला पाहीजे. गावशिवारात हिरवाई जपण्यासोबतच पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येक घटकाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. २०२०-२१ विभागीय स्तर प्रथम क्रमांक पंचायत समिती लातूर रू. ११ लक्ष, द्वितीय क्रमांक पंचायत समिती नांदेड रू. ८ लक्ष, तृतीय क्रमांक पंचायत समिती शिरूर अनंतपाळ, जि. लातूर रू.६ लक्ष. धनादेश आणि स्मृतीचिन्ह यांचे विभागीय आयुक्त श्री. अर्दड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सन २०२२-२३ जिल्हा परिषद लातूर यांना राज्यस्तरीय तृतीय क्रमांक रू.१७ लक्ष, पंचायत समिती लातूर यांना राज्यस्तर प्रथम क्रमांक रू.२० लक्ष, पंचायत समिती लातूर यांना विभागस्तर प्रथम क्रमांक रू.११ लक्ष, पंचायत समिती जळकोट, जि.लातूर यांना विभागस्तर द्वितीय क्रमांक रू.८ लक्ष, पंचायत समिती, अर्धापूर जि.नांदेड यांना विभागस्तर तृतीय क्रमांक रू.६ लक्ष असे पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी केले. डॉ. सीमा जगताप यांनी आभार मानले. विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# मुंबईतील सदनिका घोटाळ्यात मुख्यमंत्र्याचा वरदहस्त आहे का?

मुंबई । वृत्तसेवा

मुंबई महानगर पालिकेतील सनदी अधिकारी ठाण मांडून बसले आहेत. निवडणूक आयोगाने सांगून देखील या अधिकाऱ्यांच्या बदल्या का होत नाहीत. मुख्यमंत्र्यांवर या अधिकाऱ्यांनी दबाव आणला आहे का? मुख्यमंत्र्यांचा कोणी हात धरला आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सरकारने या अधिकाऱ्यांच्या वेळीच बदल्या केल्या पाहिजेत. तरच मुंबईतील निवडणुका फ्री अँण्ड फेअर वातावरणात पार पडतील, असा जोरदार हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केला आहे. सरकार या अधिकाऱ्यांच्या बदल्या करत नसल्याने आता आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाल पत्र पाठविले असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मुंबईतील साकीनाका येथे क्रांती नगर, बैल बाजार येथील झोपडपट्टी धारकांसाठी सदनिकांचे चावी वाटप करण्यात आले. यामध्ये शेकडो कोटींचा घोटाळा झाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चावी वाटप होत असताना हा घोटाळा होतो. यामध्ये मुख्यमंत्र्यांचा वरदहस्त आहे का? असा सवाल करत या घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. तळक्षरू तरवर्शीोंळुरी जप एज्ञपरींह डहळपवश मुंबईतील प्रचितगड या शासकीय निवासस्थानी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत ते बोलत



होते. यावेळी काँग्रेसचे नसीम खान उपस्थित होते. वडेट्टीवार म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त ईक्बाल सिंह चहल यांची बदली होत नाही. त्याचबरोबर अश्विनी भिडे, वेलारासू हे वरिष्ठ सनदी अधिकारी देखील त्याच ठिकाणी ठाण मांडून आहेत. अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे हे आएएएस नसताना देखील मोठ्या पदावर आहेत. हे अधिकारी मर्जीतील असल्याने ते पक्षपातीपणा करू शकतात. हे अधिकारी निधी वाटपात दुजाभाव करू शकतात. निवडणुकीदरम्यान प्रभाव पाडून शकतात. या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त केले पाहिजे. मुंबई महापालिका आता भ्रष्टाचाराचा अड्डा झाली आहे. मुंबई साफ करण्याचं काम काही अधिकारी करत आहेत. सरकारने याला वेळीच आळा घातला पाहिजे. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना सरकारने पाठीशी घालू नये, असे खडे बोल देखील वडेट्टीवार यांनी सुनावले आहेत. वडेट्टीवार म्हणाले की, साकीनाका येथे क्रांती नगर, बैल बाजार येथील झोपडपट्टी धारकांसाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सदनिकांचे चावी वाटप करण्यात आले. या चावी वाटपात मोठा घोटाळा झाला आहे. हे चावी वाटप करताना बोगस नावे घुसविण्यात आली आहेत. त्यानंतर लगेच या सदनिकांची खरेदी केली गेली. यातील काही लोक युपी मधील आहेत. ही शासनाची फसवणूक आहे. या प्रकरणात १० कोटी ५३ सदनिका संदर्भात बनावट कागदपत्रे बनवली गेली आहेत. हे हिमनगाचे टोक असून शेकडो कोटींचा यामध्ये घोटाळा झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची एसआटीमार्फत सखोल चौकशी झाली पाहिजे. या घोटाळ्याला कोणाचा आशिर्वाद आहे हे समोर आले पाहिजे. अधिकारी आणि लोकप्रतिनीधींनी संगनमताने केलेला हा घोटाळा असल्याची खरमरीत टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली आहे. काँग्रेसचे नसीम खान यांनी देखील या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक संमेलन उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील गुरुवार पेठ परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ नुकतेच मोठया उत्साहात संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हमीद चौधरी तर उद्घाटक म्हणून शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे, रोटरी क्लबचे अध्यक्ष स्वप्निल परदेशी, येथील नामांकित विधीज्ञ ॲड इस्माईल चौधरी, माजी नगरसेविका सुरय्या भाभी चौधरी, जुम्मा भाई चौधरी, उमेश नाईक इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सध्या खाजगी शाळांचे स्नेहसंमेलन मोठा गाजावाजा करत तसेच मोठ्या लखलखाटात साजरे केले जात आहेत.जिल्हा परिषदेच्या शाळेतील घटती विद्यार्थ्यांची संख्या व तेथील परिस्थिती लक्षात घेता जिल्हा परिषद शाळांचे वार्षिक स्नेहसंमेलन क्वचितच पहावयास मिळतात. गुरुवार पेठ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शतेतील शिक्षक त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपणही कोणत्या खाजगी शाळेच्या कमी नाहीत या भावनेतून आपले वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ नुकतेच संपन्न केले. शाळेच्या या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सदर केले. शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीतर्फे बेस्ट स्टुडन्ट ऑफ द क्लासम्हणुन सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी स्नेह संमेलनाचे उद्घाटक विजय रापतवार व ॲड इस्माईल चौधरी यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कला गुण सादर केले.

# राज्यातील हजारो संगणक परिचालक मुंबईत धडकणार

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत संगणक परिचालकांना यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतीच्या सुधारित आकृतीबंधात सर्वच ग्रामपंचायतीमध्ये संगणक परिचालक, डाटा एंट्री ऑपरेटर या स्वतंत्र पदाची निर्मिती करावी, किमान वेतन देण्याची व सध्या कार्यरत असलेल्या सर्व संगणक परिचालकांना या पदावर सामावून घेण्याची शासनास शिफारस करून न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णा डोरले यांनी केली. गेल्या १२ वर्षापासून राज्यातील सुमारे २९ हजार ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा, किमान वेतन द्यावे, मासिक २० हजार रुपये मानधनवाढ करावी, या मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर मागील १३ दिवसांपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. बुधवारी (दि.१३) राज्यातील हजारो संगणक परिचालक मुंबईत धडकणार असून शासनाने संगणक परिचालकांचा अंत न पाहता त्वरीत निर्णय घ्यावा. अन्यथा संगणक परिचालक मुंबई सोडणार नाहीत, असा इशारा संघटनेचे राज्य अध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी दिला आहे. सुमारे २९ हजार ग्रामपंचायतमध्ये काम करणारे २० हजार संगणक परिचालक गेल्या १२ वर्षापासून तोकड्या मानधनावर काम करीत आहेत. ग्रामीण



भागातील सुमारे ७ कोटी जनतेला सेवा देऊन शासन, प्रशासन व जनता यामधील महत्वाचा दुवा बनण्याचे काम संगणक परिचालक करीत आहेत. परंतु, त्यांना महागाईच्या काळात अतिशय तुटपुंजे म्हणजे ७ हजार रुपये पेक्षा कमी मानधन मिळत आहे. हे मानधन रोजगार हमी योजनेच्या मजुरापेक्षा कमी आहे. त्यामुळे शासनाने संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा. किमान वेतन द्यावे. मासिक २० हजार रुपये मानधनवाढ करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. त्यानुसार ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सर्व मुद्यावर चर्चा झाली. शासनाने आचारसंहिता लागण्यापूर्वी निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. त्यासाठी राज्यातील सर्व संगणक परिचालकांना बुधवारी मुंबईच्या आझाद मैदान येण्याचे आवाहन केले आहे. राज्यातून हजारो संगणक परिचालक मुंबईत दाखल होत आहेत. जोपर्यंत शासन निर्णय घेणार नाही, तोपर्यंत मुंबई सोडणार नसल्याचा इशारा सिद्धेश्वर मुंडे यांनी दिला आहे. ग्रामपंचायत कर्मचार्यांना किमान वेतन, कोतवाल, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस आशा वर्कर तसेच गट प्रवर्तक यांच्या मानधन वाढ झाली आहे. परंतु, शासनाने संगणक परिचालकांचे मानधनात वाढ न केल्याने संगणक परिचालकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. त्यांच्या मानधनात वाढ झाली याचा आम्हाला आनंद आहे. पण आम्हीच काय पाप केलं ? अशी भावना संगणक परिचालकांच्या मनात निर्माण झाली आहे. ग्रामविकास विभागाने नव्याने लोकसंख्या निहाय टार्गेटची पद्धत सुरू केली आहे. अनेक ठिकाणी १ ते ३३ नमुने उपलब्ध नाहीत. मग ऑनलाईन कसे करायचे? कोणत्याही प्रकारचे स्वयंघोषणापत्र किंवा इत्तर दाखल्यांचे मागणी अर्ज ग्रामपंचायतीस आल्यावर तो दाखला देण्यात येतो. परंतु फक्त टार्गेट पूर्ण करण्यासाठी चुकीच्या एंट्री आणि बोगस प्रमाणपत्र देण्यास उडउ, ड्झत ही कंपनी संगणक परिचालकांवर दबाव आणते.

# तेलबिया उत्पादकता वाढ विकास कार्यक्रम गतीने राबविण्यात यावा -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**
कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस ,सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रम गतीने राबविण्यात यावा असे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. मंत्रालय मध्ये आज राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस ,सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रम आढावा व सन २०२४-२५ आराखड्यास मान्यता बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी श्री.मुंडे बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त प्रवीण गेडाम, वित्त विभागाचे सहसचिव डॉ माधव वीर, कृषी चे उपसचिव संतोष कराड, कृषी आयुक्त कार्यालयाचे संचालक दिलीप झेंडे यांच्या सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री मुंडे म्हणाले,एकात्मिक कापूस ,सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास कार्यक्रमात सोयाबीन यापीकाचा २६ जिल्ह्यांत समावेश आहे तर २१ जिल्ह्यात कापूस पीकांचा समावेश आहे.या कार्यक्रमासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद वितरित करण्यात आली आहे त्यामुळे हा कार्यक्रम राबविण्यास गती द्यावी.या कार्यक्रमांसाठी आणखी निधीची गरज भासल्यास तो निधी ही उपलब्ध करून देण्यात येईल. ही योजना समूह आधारित आणि शेतकरी उत्पादक कंपनी यांना केंद स्थानी ठेवून



तयार करण्यात आलेली आहे.शेतकर्यांनी नॅनो युरिया व नॅनो डीएपी वापर वाढविण्यासाठी त्यांचा प्रचार व प्रसार करावा.तसेच सन २०२४-२५ च्या पिक प्रात्यक्षिकांच्या पॅकेज मध्ये सुद्धा नॅनो युरिया व नॅनो डीएपी समावेश करण्यात येणार आहे.देशामध्ये नॅनो युरिया व नॅनो डीएपी वापरण्यात महाराष्ट्र राज्य एक नंबर बनण्यासाठी विभागाने मिशन मोडवर काम करावे असे निर्देश ही कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले.

## पत्रकार गीतांजली लव्हाळे यांना आदर्श पुरस्कार जाहीर

वडवणी - बीड जिल्ह्यामध्ये एकमेव रयत सामाजिक प्रतिष्ठान संस्था आहे गेल्या चार



वर्षापासून ज्या संस्थेने आतापर्यंत राज्यभरामधून वेगवेगळया उपक्रमाच्या माध्यमातून ४० ते ५० हजार सदस्य जमवलेले आहेत. व प्रत्येक वर्षी म्हणजे यावर्षी २०२४ चौथ्यांदा पुरस्कार वितरण सोहळा होत आहे. बीडमध्ये त्याच अनुषंगाने वडवणी येथील पहिल्या महिला पत्रकार म्हणून गीतांजली लव्हाळे मॅडम यांना आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार रयत परिषद सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने जाहीर झाला आहे. या पुरस्कारचे वितरण १० मार्च २०२४ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे दुपारी १ वाजता संपन्न होणार आहे. पत्रकार गीतांजली लव्हाळे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आनंदाचे वातावरण आहे प्रत्येक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

## भागवत लांडे यांचे निधन

वडवणी - वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा येथील रहिवाशी भागवत जनार्धन लांडे यांचे



वयाच्या ७७ व्यावर्षी बुधवार दि.६ मार्च रोजी १२ वाजण्याच्या सुमारास दुःखत निधन झाले. वारकरी संप्रदाय ची विचारधारा जपणारे म्हणून भागवत लांडे यांच्याकडे पाहिले जात. काल सायंकाळ चार वाजण्याच्या सुमारास सोन्नाखोटा गावातील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. तर त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, नातु असा मोठा परिवार असून लांडे यांच्या दुःखात दैनिक मराठा पत्र परिवार देखील सहभागी आहे.

## उद्यानातील लहान मुलांच्या खेळासाठी कुठलेही मूल्य घेऊ नका

बीड - बीड नगरपालिका उद्यानांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. खरे तर उन्हाळ्यामध्ये सुट्टीच्या दिवसात मोठ्या प्रमाणात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिक उद्यानांत जात असतात. खेळ व विरंगुळ्यासाठी लहान थोर येथे येतात परंतु शहरातील माने कॉम्प्लेक्स भागातील जोशी उद्यानांची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झालेली दिसून येत आहे . याबाबत तात्काळ नगरपालिका प्रशासनाने संबंधित यंत्रणेकडून माहिती घेऊन उद्यानामध्ये सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा शिवसंग्रामच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल.

## तुलसीच्या कर्मचाऱ्यांना दिल्ली,मनाली टूर्सची भेट



बीड - येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील कर्मचारी यांनी महाविद्यालयाच्या विविध कामांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना संस्थाचालक प्रा.रोडे यांनी दिल्ली, मनाली टूर्सची भेट देऊन अनोखा उपक्रम राबविला आहे. सन २०२१-२२ आणि २२- २३ या शैक्षणिक वर्षांमध्ये येथील कर्मचारी प्रा.किशोर वाघमारे, प्रा.अंकुश सुर्वे, प्रा.समीर मिर्झा, प्रा.भारत उघडे, माता रमाई बँकेचे मॅनेजर प्रशांत वाघमारे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबद्दल संस्थाचालक प्रा.रोडे यांनी दिल्ली आणि मनाली येथील विविध ठिकाणाला जाण्यासाठी संस्थेच्या वतीने त्यांना टूर्स ची भेट दिली आहे. यात छत्रपती संभाजी नगर ते दिल्ली असा विमान प्रवास आहे. येथून पुढे ते दिल्ली आणि मनाली येथील ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणार आहेत.यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

## जिल्हाधिकारी कार्यालयात महिला दिवस होणार साजरा

**बीड । प्रतिनिधी**
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम होणार असून जिल्हाधिकारी कार्यालयात उद्या शुक्रवारी ७ मार्चला दुपारी ११: ३० वाजता महिला दिनाचा कार्यक्रम होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी (संपादकीय पानावर)



बीड - चौरे पाटील यांचे चिरंजीव व कदम पाटील यांची कन्या यांच्या विवाहप्रसंगी उपस्थित राहून वधू-वरांना सुभा आशीर्वाद देताना दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे, वराट, उद्धव येवले यासमवेत मान्यवर दिसत आहेत.



वडवणी - मराठी पत्रकार परिषदेचे पुणे विभागीय सचिव श्री.गणेश मोकाशी सर यांनी नुकतीच वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यालयास भेट दिली असता त्यांचे यथोचित स्वागत सत्कार करण्यात आला.यावेळी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष वाघमारे,दैनिक राज्य लोकतंत्रचे बीड जिल्हा ब्युरो चीफ अशोक खाडे,मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष विनायक जाधव,हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक सुधाकर पोटभरे,पत्रकार हरी पवार,पत्रकार ओमप्रकाश साबळेसह आदींची उपस्थिती होती.

## पशुधनाच्या काळजीसाठी कृषी विभागाचा नवा उपक्रम

**परळी । प्रतिनिधी**
महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्र अंतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या 'फुले अमृतकाळ' या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (प) लोकार्पण कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात (संपादकीय पानावर)



## महात्मा बसवेश्वर सामाजिक पुरस्कारासाठी अर्जाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**
लिंगायत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक, समाज प्रबोधनकार आणी समाज सेवकांना तसेच सदर समाजास कार्य करणा-या संस्थाना प्रतिवर्षी वैशाख शुध्द (अक्षय तृतीया) या दिवशी एक व्यक्ती व एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक पुरस्कार देण्यात येणार असून पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक शिंदे यांनी केले आहे. प्रस्तावासोबत विरशैव-लिंगायत समाजासाठी करण्यात आलेले कार्य या संदर्भातील माहिती व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. प्रस्ताव विहीत नमून्यात दि. १५ मार्च २०२४ पर्यंत सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण कार्यालय, डॉं. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ३ रा मजला येथे विहीत नमुन्यात दाखर करावेत



बीड - सेंद्रिय शेतीचे धडे घेण्यासाठी ता बीड मधील ४३ शेतकरी कृषी विज्ञान केंद्र कान्हेरी मठ ता जि कोल्हापूर कडे रवाना. आत्मा नियामक मंडळाचे अध्यक्ष मा जिल्हाधिकारी , बीड श्रीम. दिपा मुधोळ मुंडे यांचे अध्यक्षतेखाली , मा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री बाबासाहेब जेजुरकर व प्रकल्प संचालक आत्मा, श्री साळवे यांचे मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यातील ४३ शेतकरी सेंद्रिय शेती चे प्रशिक्षण घेण्याकरिता कृषी विज्ञान केंद्र कन्हेरी मठ तालुका जिल्हा कोल्हापूर येथे दिनांक ४ ते ६ मार्च या कालावधीत तीन दिवसीय प्रशिक्षण घेण्याकरिता आज रोजी रवाना झाले यामध्ये ३० महिला शेतकरी यांचा सहभाग आहे. यावेळी उपस्थित मा तालुका कृषी अधिकारी तथा प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री बाळासाहेब गंडे, मा मंडळ कृषी अधिकारी श्री जळक, कृषी पर्यवेक्षक श्री एस एम जोगदंड, बीड व शेतकरी गट प्रमुख श्री रामप्रसाद डोईफोडे , श्री विठ्ठल घरत आदी शेतकरी बांधव दिसत आहेत.



बीड - वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेकनूर येथील प्राचार्य पैठणे , प्राध्यापक व शिक्षक यांनी संजय शिंदे यांचे अभिनंदन करून सत्कार केला.

## अनाधिकृत बांधकाम प्रकरणी मुख्याधिकारी कारवाई करतील ?

**बीड । प्रतिनिधी**
बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील बीड नगर परिषद सर्व्हे नंबर १९२ तरफ खोड मधील प्लाट क्रमांक जुना २-९-४८५ व नविन मालमत्ता क्रमांक २-९-४८७ मधिल कालिंदेश्वर महादेव मंदिराच्या जागेवरील अतिक्रमण प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या तक्रारीनंतर सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.८ जुन २०२३ रोजी एकंदरीतच २ वेळा मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणात कारवाई करून अर्जदारास परस्पर कळविण्याचे निर्देश दिले आहेत.त्या अनुषंगाने आता दि.१ मार्च २०२४ रोजी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांनी कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश देऊन सुद्धा कारवाई केल्याचे दिसून येत नाही त्या अनुषंगाने स्वच्छता विभाग यांनी तातडीने संयुक्त कार्यवाही नियमानुसार करून अनुपालन अहवाल (संपादकीय पानावर)

# प्रितमताई मुंडे यांना खासदार पदावर विराजमान करण्यासाठी गाव चलो अभियान

**आष्टी प्रतिनिधी**
भारतीय जनता पार्टीतर्फे व्यापक जनसंपर्कासाठी ''गाव चलो अभियान'' सुरू आहे त्या अनुषंगाने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे, खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी गाव चलो अभियानात प्रभावी पणे राबवत आष्टी मतदार संघ पिंजून काढला आहे. दि.६ रोजी कऱ्हेवाडी



येथील हरिनारायण स्वामी विद्यालय येथे बीड सांगवी जि.प. गटातील कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली होती. मोदी सरकारचे दहा वर्षांत विविध क्षेत्रातील केलेली प्रभावी कामे सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी आ. धोंडे गेल्या पंधरा दिवसांपासून सातत्याने प्रयत्न करत आहेत . पंतप्रधान नरेंद्र मोदी जगात (संपादकीय पानावर)



# वडवणी तालुक्यातील तमाम जनतेचा लोकनायक

**वडवणी । प्रतिनिधी**
वडवणी तालुकाप्रमुख विनायक मुळे हे गत २० ते २५ वर्षापासून हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा एक सच्चा शिवसैनिक म्हणून वडवणी तालुक्यात कार्यरत आहेत, वडवणी तालुक्यात शिवसेना वाढविण्यात त्यांचा मोठा हातभार आहे. शेतकरी कष्टकरी, मजूर, शालेय विद्यार्थी, यांच्यासह समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी ते तळमळीने काम करतात. तालुक्यातील सर्व जाती धर्माच्या जनतेसाठी रात्री-बेरात्री कुठल्याही अडचणीत कठीण प्रसंगी ते उभे असतात. वडवणी तालुक्यातील जनतेला मिळालेलं हक्काचे व्यासपीठ म्हणजे विनायक मुळे थेट रस्त्यावर उतरून न्याय देण्यासाठी देण्याची त्यांची कार्यशैली जनतेला आवडते, जनसामान्यांच्या प्रत्येक अडचणींची जाण त्यांना आहे कारण त्यांनी एक काळ ऊसतोड कामगार म्हणून काम केलेले आहे. याशिवाय किराणा दुकानात मुनीम म्हणून जबाबदारी पण पार पाडलेली आहे. हलाखीची स्थिती असणार्या या शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व (संपादकीय पानावर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com